॥ संत् तुकाराम यांचे साखळीचे अभंग ॥

श्री तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेल्याचे कळताच त्यांचे शिष्य इंद्रायणी नदीवर गेले व तेथे श्रीतुकारामांचे दर्शन झाल्याशिवाय अन्न घ्यायचे नाही असा निश्चय करून राहिले. तीन दिवसानंतर पंचमीच्या दिवशी आकाशातून त्यांचे टाळ, गोधडी व हे अभंग खाली आले. ते 'साखळीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत .

हे अभंग गुरुदेव रानडे यांच्या निंबाळ आश्रमांत नित्य-नेमावलींत गातात। गुरुदेव हे नाथ संप्रदायातील निंबर्गी उपसंप्रदायातले एक महा विद्वान भक्त होते (१८८६-१९५७)।

१

जन्माचें तें मूळ पाहिले शोधून ।दुःखासी कारण जन्म घ्यावा ॥१॥
पाप पुण्य करुनी जन्मा येतो प्राणी ।नरदेहा येवुनी हानी केली ॥२॥
रजतमसत्व आहे ज्याचे अंगीं ।याच गुणें जगीं वाया गेला ॥३॥
तम म्हणजे काय नरकचि केवळ ।रज तो सबळ मायाजाळ ॥४॥
तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य ।करवी परमार्थ अहर्निशीं ॥५॥

२

अहर्निशीं सदा परमार्थ करावा ।पाय न ठेवावा आडमार्गीं ॥१॥
आडमार्गीं कोणी जन जे जातील ।त्यांतून काढील तोचि ज्ञानी ॥२॥
तोचि ज्ञानी खरा तारी दुजीयांसी ।वेळोवेळा त्यासी शरण जावें ॥३॥
आपण तरेल नव्हे ते नवल ।कुळें उद्धरील सर्वांची तो ॥४॥
शरण गेलिया काय होतें फळ ।तुका म्हणे कुळ उद्धरिलें ॥५॥

३

उद्धरिलें कुळ आपण तरला ।तोचि धन्य झाला त्रैलोक्यांत ॥१॥
त्रैलोक्यांत भला अद्वैतीं निमाला ।योग जो साधिला साधन बरें ॥२॥
बरें जें साधन सुख शांत मन ।क्रोध नाहीं जाण तिळभरी ॥३॥
तिळभरी दोष नाहीं तें निर्मळ ।तुका म्हणे जळ गंगेचें तें ॥४॥

४

जैसी गंगा वाहे तैसें त्याचें मन ।भगवंत जाण तया जवळी ॥१॥
तया जवळी देख भक्तिभावें उभा ।स्वानंदाचा गाभा तया दिसे ॥२॥
तया दिसे रूप अंगुष्ठ-प्रमाण ।अनुभवी खूण जाणती हे ॥३॥
जाणती हे खूण स्वात्माऽनुभवी ।तुका म्हणे पदवी ज्याची त्याला।४॥

५

ज्याची त्याला पदवी येराला न साजे ।संताला उमजे आत्मसुख ॥१॥
आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी ।वाउगी चावटी नका करूं ॥२॥
नका करूं कांहीं संतसंग धरा ।पूर्वींचा दोर उगवेल ॥३॥
उगवेल प्रारब्ध संतसंगें करुनी ।प्रत्यक्ष पुराणीं वर्णियेले ॥४॥
वर्णियेली कीर्ति नामरूप घोष ।जातील ते दोष तुका म्हणे ॥५॥

६

दोष ते जातील अनंत जन्मींचे ।पाय ते देवाचे न सोडावे ॥१॥
न सोडावे पाय ऐसा निश्चय करा ।आळवा शार्ङ्गधरा भाववळें ॥२॥
धरुनी केशवा आणा भाववळें ।पापीया नकळे कांही केल्या ॥३॥
न कळे तो देव सत्संगावांचुनी ।वासना जाळोनी शुद्ध करा ॥४॥
शुद्ध करा मन व्हा रे देहातीत ।ओळखा वस्तूतें तुका म्हणे ॥५॥

७

वस्तूतें ओळखा सांडा रे कल्पना ।नका आडराना जाऊं झणी ॥१॥
झणीं जाल कोठें बुडवाल हित ।विचारी मनांत आपुलिया ॥२॥
आपुलिया जीवें शिवासी पहावें ।आत्मसुख घ्यावें वेळोवेळां ॥३॥
घ्यावें आत्मसुख स्वरूपीं मिळावें ।भूतीं लीन व्हावें तुका म्हणे ॥४॥

८

भूतीं लीन व्हावें सांगावें नलगेचि ।आतां अहंकाराची शांती करा ॥१॥
शांती करा तुम्ही ममता नसावी ।अंतरीं असावी भूतदया ॥२॥
भूतदया ठेवी तया काय उणें ।प्रथम साधन हेंचि असे ॥३॥
असें जें साधन जया चित्तीं वसे ।मायाजाळ नासे तुका म्हणे ॥४॥

९

मायाजाळ नासे या नामेंकरुनी ।प्रीती चक्रपाणी असों द्यावी ॥१॥
असों द्यावी प्रीती साधूचे पायांसी ।कदा कीर्तनासी सोडूं नये ॥२॥
सोडूं नये कीर्तन पुराणश्रवण ।मनन निजध्यासन साक्षात्कार ॥३॥
साक्षात्कार झालिया सहज समाधि ।तुका म्हणे उपाधि गेली त्याची ॥४॥

१०

गेली त्याची जाणा तोचि ब्रह्म झाला ।अंतरीं निवाला पूर्णपणें ॥१॥
पूर्णपणें धाला राहतो कैसा रीती ।त्याची आतां स्थिती सांगतों मी ॥२॥
सांगतों मी तुम्हा ऐका मनोगत ।राहतो मूर्खवत जगामाजीं ॥३॥

जगांत पिशाच अंतरी शहाणा ।सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ॥४॥
निमग्न तो सदा जैसा मकरंद ।अंतर्बाह्य भेद वेगळाले ॥५॥
वेगळाले भेद क्रुती त्या असती ।हृद्गद त्याची गती नकळे कवणा ॥६॥
नकळे कवणाला तयाचे ते वर्म ।योगी जाणे मर्म-खूण त्याची ॥७॥
खूण त्याची जाणे जे कां तैसे असती ।तुका म्हणे भ्रांती दुजीयाला ॥८॥

११

दुजियाला भ्रांती भाविकाला शांती ।साधूंचिया वृत्ती लीन झाल्या ॥१॥
लीन झाल्या वृती ब्रह्मीं ते मिळाले ।जळांत आटले लवण जैसे ॥२॥
लवण जैसे पुन्हा जळाचे बाहेर ।येत नाही खरें त्यांतुनीया ॥३॥
त्यासारिखी जाणा तुम्ही साधुवृत्ती ।पुन्हां न मिळती मायाजाळीं ॥४॥
मायाजाळ त्यांना पुन्हा रे बाधेना ।सत्य सत्य जाणा तुका म्हणे ॥५॥

१२

स्वर्गलोकींहुनी आले हे अभंग ।धाडियेले सांग तुम्हालागीं ॥१॥
नित्य नेमें यासी पढतां प्रतापें ।जळतील पापें जन्मांतरींची ॥२॥
तया मागें पुढें रक्षी नारायण ।मांडिल्या निर्वाण उडी घाली ॥३॥
बुद्धीचा पालट नासेल कुमती ।होईल सद्गती येणें पंथें ॥४॥
सद्गती झालिया सहज साक्षात्कार ।होईल उद्धार पूर्वजांचा ॥५॥
साधितील येणें इहपरलोक ।सत्य सत्य भाक माझी तुम्हां ॥६॥
परोपकारासाठीं सांगितले देवा ।प्रासादिक मेवा ग्रहण करा ॥७॥
येणें भवव्यथा जाईल तुमची ।सख्या विठ्ठलाची आण मज ॥८॥
टाळ आणि कंथा धाडिली निशाणी ।घ्यारे ओळखोनि सज्जन हो ॥९॥
माझें दण्डवत तुम्हां सर्व लोकां ।देहासहित तुका वैकुंठासी ॥१०॥

१३

सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा ।अनुभव पहा पदोपदीं ॥१॥
पदोपदीं पहा श्रीमुख चांगलें ।प्रत्यक्ष पाऊले विठोबाची ॥२॥
विठोबाची भेटी घडेल वाचितां ।तुम्हालागीं आतां सांगितलें ॥३॥
सांगितलें खरें विश्वाचिया हिता ।अभंग वाचितां जे कां नर ॥४॥
ते नर पठणीं जीवन्मुक्त झाले ।पुन्हां नाही आले संसारासी ॥५॥
संसार उडाला संदेह फिटला ।पूर्ण तोचि झाला तुका म्हणे ॥६॥

१४

पांच कोटि एक लक्षाचा शेवट ।चौतीस सहस्र स्पष्ट सांगितले ॥१॥
सांगितले इतुके कथुनियां गेला ।बारा अभंगाला सोडूं नका ॥२॥
सोडूं नका तुम्हा सांगितले वर्म ।भवपाश-कर्म चुकतील ॥३॥
चुकती यातायाती विठोबाची आण ।करा हे पठण जीवेंभावें ॥४॥
जीवेंभावें करिता होईल दर्शन ।प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे ॥५॥

१५

वेदांचे अभंग केले श्रुतिपर ।द्वादश सहस्र संहितेचे ॥१॥
निघंट निरुक्त आणि ब्रह्मसूत्र ।अवतार सहस्र उपग्रंथ ॥२॥
अभंग ते कोटि भक्तिपर झाले ।ज्ञानपर बोलिले तितुकेचि ॥३॥
पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें ।नाम तें गाइलें तितुकेंची ॥४॥
साठ लक्ष केला बोध या जनासी ।वर्णिले रूपासी तितुकेंची ॥५॥
तीस लक्ष केली देवासी करुणा ।कर्मकांड जाणा एक लक्ष ॥६॥
द्वादश सहस्र स्वात्माऽनुभव ।एवं जाणा सर्व संख्या ऐशी ॥७॥
ऐसे हे अभंग झालेसे भूतळीं ।बारा अंतराळीं पत्रिकेचे ॥८॥
चौतीस सहस्र लक्ष एक कोटी पांच ।सांगोनिया साच गेला तुका ॥९॥

१६

सगुण हें ब्रह्म विठ्ठलचि बोले ।ऐक पां वहिले तुकारामा ॥१॥
तुकारामा तुवां केले जे अभंग ।करिती जे कां जगीं नित्य पाठ ॥२॥
जगीं पाठ करितां आवडी सद्भावे ।विपत्ति न होय त्या प्राण्यासी ॥३॥
प्राण्याचें कल्याण होईल बा पाहे ।भावे वाचितां हे नित्य नेमें ॥४॥
नेमें संकष्टासी करी अकरा पाठ ।विघ्न त्याचें स्पष्ट दूर होय ॥५॥
दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया ।शेवटी निज ठायां नेईन मी ॥६॥

Please send corrections to sunderh@hot,ail.co, Last updated July 20, 1998